# जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त बीड, जिल्हा बीड यांचे कार्यालय

जिल्हा पशुसवैदयकीय सर्वचिकित्सालय परिसर, सुभाष रोड, बीड. फोन नं - ०२४४२-२९७०२२ पिन कोड : ४३११२२
Email –ddcahbeed@gmail.com

## जाहीर लिलाव

निरुपयोगी द्रवनत्र पात्रे खरेदी करणाऱ्या इच्छुक व्यक्ती/कंपन्या/खरेदीदार याना सूचना देण्यात येते कि, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र बीड जिल्हा बीड, या कार्यालय अंतर्गत निरुपयोगी, निर्लेखित केलेली खालीलप्रमाणे विविध साईझ ची द्रवनत्र पात्रे जाहीर लिलावाद्वारे विक्री करावयाची आहेत. सादर द्रवनत्र पात्रे इच्छुकांना ज्या स्थितीत आहेत त्या स्थितीत पाहण्यासाठी कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. लिलावाच्या साहित्याचा तपशील खालीलप्रमाणे –

| अ. क्र. | लिलावाचा दिनांक | द्रवनत्र पात्राचा प्रकार | एकूण नग |
|---|---|---|---|
| 1 | | BA-3 | 131 |
| 2 | | TA 50 | 24 |
| 3 | | TA 55 | 44 |
| | | **एकूण** | **199** |

त्याकरिता दि. १२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय, पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय परिसर, सुभाष रोड बीड, येथे जाहीर लिलाव करण्यात येणार आहे. ज्या संस्था/कंपन्या/ व्यापारी याना निरुपयोगी द्रवनत्र पात्रे खरेदी करावयाची असतील अश्या संस्था/कंपन्या/व्यक्तींनीच भाग घ्यावा. भाग घेण्यासाठी इच्छुकांनी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, बीड यांचे नावे रु. १०,०००/- चा धनाकर्ष सादर करणे आवश्यक आहे. जाहीर लिलावासाठी गठीत जिल्हास्तरीय समितीचा निर्णय अंतिम असेल. लिलावानंतर विक्री करावयाची सर्व द्रवनत्र पात्रे हि चेपून मगच हस्तांतरित करण्यात येतील जेणेकरून त्यांचा पुनर्वापर करणे शक्य होणार नाही.

(डॉ. आर. डी. कदम)
**जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त**
**बीड**

# जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त बीड, जिल्हा बीड यांचे कार्यालय

जिल्हा पशुसवैदयकीय सर्वचिकित्सालय परिसर, सुभाष रोड, बीड. फोन नं - ०२४४२-२९७०२२ पिन कोड : ४३११२२
Email –ddcahbeed@gmail.com

**जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र बीड या कार्यालयातील भांडारातील निरुपयोगी जडसंग्रह वस्तूंचा लिलाव**

**दि. १२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता**

## अटी व शर्ती

१. भाग घेणाऱ्यास अनामत रक्कमम रुपये १०,०००/- धनाकर्षाच्या स्वरूपात भरावी लागेल.

२. लिलावात सहभागी होणाऱ्या बोली धारकाने धनाकर्ष व इतर अनुषंगिक कागदपत्रे सादर करण्यासाठी दि. ०५/०२/२०२५ ते दि. ११/०२/२०२५ पर्यंत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय बीड, यांच्या कार्यालयात सकाळी ११.०० वा ते साय. १७.०० वाजेपर्यंत (सुट्टीचा दिवस सोडून) असेल. त्यानंतर सहभागी होणाऱ्या बोलीधारकांचे धनादेश व इतर कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.

३. सदरची रक्कम अयशस्वी लिलाव धारकास अनामत रक्कम लिलाव पूर्ण होताच परत करण्यात येईल.

४. यशस्वी लिलाव धारकास अनामत रक्कम, लिलावाची रक्कम पूर्ण भरल्यानंतर परत करण्यात येईल.

५. लिलाव तीन वेळा पुकारल्यानंतर अंतिम निर्णय घेण्यात येईल. सर्व वस्तूंची मिळून बोली बोलावी लागेल. विशिष्ट वस्तू साठी बोली बोलता येणार नाही.

६. लिलावामध्ये ज्या बोली धारकाची बोली सर्वाधिक असेल त्याच्याच नावाने लिलाव तीन वेळा बोली पुकारून लिलावास अंतिम मंजुरी देण्यात येईल.

७. अंतिम लिलाव ज्यांचे नावे मंजूर होईल त्या व्यक्तीने लिलावाची संपूर्ण रक्कम कार्यालयाच्या खालील बँक खात्यात आरटीजीएस अथवा धनाकर्ष द्वारे जमा करावी. पूर्ण रक्कम ताबडतोब जमा न केल्यास त्या व्यक्तीची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व सदरचा माल नंतरची जास्त बोली असलेल्या व्यक्तीस देण्यात येईल. रक्कम भरावयाच्या खात्याचा तपशील खालील प्रमाणे -

**जिल्हा पशुसंवर्धन उप आयुक्त, बीड यांचे District Deputy Commissioner of Animal Husbandry, Beed या नावे असेलेले खाते क्र. 62002136744 , IFSC Code SBIN0020028**

८. अंतिम लिलाव ज्यांचे नावे मंजूर होईल त्यांनी लिलावातील संपूर्ण वस्तूंची वाहतूक स्वतःचे वाहनाने त्याच दिवशी करावयाची आहे. या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचे वाहन, हमाल, मदतनीस मिळणार नाही. तसेच लिलाव अंतिम झालेल्या वेळेपासून मालाची प्रत्यक्ष वाहतूक करेपर्यंत लिलावाच्या वस्तूंचे

संरक्षण, बोली धारकाने स्वतः करावयाचे आहे. या कालावधीत लिलावातील कोणतीही वस्तू गहाळ झालेस या कार्यालयावर जबाबदारी राहणार नाही.

९. लिलावामध्ये समाविष्ट असलेल्या वस्तू जसे कि द्रवनत्र पात्रे जशा आहेत तशाच व यथास्थिती घ्याव्या लागतील. द्रवनत्र पात्रांसोबत त्या पात्रांची झाकण, रबर रिंग अथवा कॅनिस्टर मिळणार नाही याची नोंद घ्यावी. लिलावाच्या वस्तू अगोदरच पाहून घ्याव्यात, नंतर कुठल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

१०. लिलावात सहभागी होणाऱ्याने स्वतःची ओळख, त्यांचा पत्ता इ. कागदपत्रे सादर करावे लागतील. उदा. आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र, वीजबिल इ.

११. लिलावास अंतिम मंजुरी देणे अथवा लिलाव नाकारणे, स्थगित करण्याचा किंवा लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार लिलाव समितीस असेल व तो सर्व बोलीधारकास बंधन कारक असेल.

१२. लिलावाच्या दरम्यान लिलावासंबंधी कोणत्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास या बाबतचा अंतिम निर्णय हा अध्यक्ष लिलाव समिती यांचा असेल व सर्व बोली धारकास तो बंधनकारक राहील.

१३. वरील अटी व शर्ती मंजूर असणाऱ्या खरेदीदारालाच लिलावात भाग घेता येईल.

**लिलावाचे ठिकाण-** जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय, पशुवैद्यकीय सर्वचिकित्सलाय परिसर सुभाष रोड बीड.

(डॉ. आर. डी. कदम)
**जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त**
**बीड**